**फौजदारी जामीन अर्ज क्रमांक २१४/२०२६ मधील निशाणी १ खालील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम ४८२ अन्वये तुळजापूर पोलीस स्टेशन गु.र.नं. १७२/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ३५२, ३५१ (२), १८९(२), १९१ (२), १९१ (३) आणि अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम कलम ३ (१)(आर), ३ (१)(एस) या गुन्हयामध्ये अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी दाखल केला आहे. या प्रकरणाची पार्श्वभूमी खालीलप्रमाणे आहे.

२. या प्रकरणातील फिर्याद दिनांक ०८.०४.२०२६ रोजी दाखल केली आहे. फिर्यादीवरुन असे दिसून येते की, फिर्यादी अनुसुचीत जातीचा आहे. त्याचा भाउ शंकर हा धाराशिव पार्कींग येथे पानटपरी चालवितो. दिनांक ०५.०४.२०२६ रोजी रात्री ०९.३० वाजता फिर्यादी घरी असतांना साहिल शेख याने फिर्यादीच्या भावाला फोन करुन सांगितले की, धाराशिव पार्कींग येथे गणेश कांबळे यास काहीजण मारहाण करत आहेत. म्हणून फिर्यादी आणि त्याचा भाऊ त्या ठिकाणी गेले असता, चिंता रसाळ (अर्जदार) याने फिर्यादीच्या डोक्यामध्ये फायटरने वार केला, आरोपी सुरज रसाळ (अर्जदार) याने लोखंडी रॉडने फिर्यादीवर वार केला व आशिष पवार (अर्जदार) याने दगडाने फिर्यादीच्या डोक्यात मारले. अक्षय परमेश्वर याने फिर्यादीला जातीवाचक शिवीगाळ केली.

३. आरोपीचे वकीलांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार क्र. १ ते ३ हे अनुसुचित जातीचे आहेत. त्यामुळे अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम या अर्जदारांना लागू होत नाही. अर्जदारांच्या वकीलांनी पुढे असा युक्तीवाद केला आहे की, घटना दिनांक ०५.०४.२०२६ रोजी घडली आहे आणि फिर्याद दिनांक ०८.०४.२०२६ रोजी दाखल केली आहे. फिर्याद दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे स्पष्टीकरण दिलेले नाही. फिर्यादीमध्ये आरोपींच्या जातीचा उल्लेख नाही. तिन्ही आरोपींनी वेगवेगळया हत्यारांनी फिर्यादीवर हल्ला केला आहे असा आरोप आहे. त्यामुळे फिर्यादीला तीन वेगवेगळया जखमा होणे अपेक्षीत होते. परंतु तसे झाले नाही. भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१) या गुन्हयास ३ वर्ष कारावास व दंड ही

शिक्षा आहे. या सर्व मुद्दयांचा विचार करुन हा अर्ज मंजूर करावा.

४. याउलट जिल्हा शासकीय अभियोक्ता श्री. एम.बी.देशमुख यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार क्र. १ ते ३ यांनी गंभीर हत्याराने फिर्यादीवर हल्ला केला आहे. तिन्ही अर्जदार/आरोपींची गुन्हयामधील भुमिका फिर्यादमध्ये स्पष्टपणे नमूद केली आहे. या गुन्हयामध्ये समानतेच्या तत्वावर अर्जदारांना जामीन देता येणार नाही. कारण आरोपी अक्षय परमेश्वर याने गुन्हयामध्ये कोणतेही हत्यार वापरलेले नाही. या उलट या आरोपींनी गुन्हयामध्ये हत्यार वारपले आहे. हे हत्यार जप्त करावयाचे आहे. त्याचप्रमाणे या अर्जाला उक्त अधिनियमाचे कलम १८ ची बाधा आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

५. या प्रकरणात फिर्यादीने निशाणी ८ येथे आपले म्हणणे सादर करुन अर्जास हरकत घेतली आहे.

६. या प्रकरणामध्ये भारतीय न्याय संहिता कलम १९१ (३) हा गुन्हा सर्वात गंभीर असून या गुन्हयास ५ वर्ष कारावास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा नमूद केली आहे.

७. फिर्यादीचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, फिर्यादीमध्ये केवळ फिर्यादीची जात नमूद आहे. आरोपीची जात नमूद नाही. आदरणीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी मनोहर मर्तंडराव कुलकर्णी वि. महाराष्ट्र शासन, २००५ ऑल एमआर (क्रिमीनल) २६०२ या प्रकरणामधील परिच्छेद ११ मध्ये असे मत नोंदविले आहे की, अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम कलम ३ अन्वये गुन्हा नोंद करतांना फिर्यादीमध्ये फिर्यादीची तसेच आरोपीची जात नमूद करणे आवश्यक आहे. जर फिर्यादीमध्ये फिर्यादीची किंवा आरोपीची जात नमूद नसेल तर सदर कायदयाच्या तरतुदी लागू होत नाही. आदरणीय उच्च न्यायालयाच्या वरील मत प्रवाहावरुन असे दिसून येते की, या जामीन अर्जाला कलम १८ चा बाधा येत नाही.

८. फिर्यादीवरुन असे दिसून येते की, तिन्ही अर्जदार घटनेच्यावेळी हजर होते आणि त्यांनी गुन्हयामध्ये प्रत्यक्ष सहभाग नोंदविला आहे. आरोपी चिंता रसाळ याने या गुन्हयामध्ये फायटरने फिर्यादीच्या डोक्यावर वार केला आहे. आरोपी सुरज रसाळ यांनी लोखंडी पाईपने फिर्यादीच्या डोक्यावर वार केला आहे आणि

आरोपी आशिष पवार यांनी दगडाने फिर्यादीच्या डोक्यावर वार केला आहे. आरोपींनी या गुन्हयामध्ये वापरलेली हत्यारे जप्त करणे आवश्यक आहे. त्याकरिता आरोपींच्या पोलीस कोठडीची आवश्यकता आहे.

९. या न्यायालयाने अक्षय परमेश्वर याला जामीनावर मुक्त केले आहे. परंतु समानतेच्या तत्वावर अर्जदार यांना जामीनावर मुक्त करता येणार नाही. कारण अक्षर परमेश्वर याने गुन्हयामध्ये कोणतेही हत्यार वापरलेले नाही. याउलट अर्जदारांनी या गुन्हयामध्ये हत्यार वापरले आहे आणि ते जप्त करणे आवश्यक आहे.

१० वर नमूद कारणांमुळे आरोपींचा हा जामीन अर्ज मंजूरीस पात्र नाही असा निष्कर्ष मी काढला आहे. या निष्कर्षावरुन मी खालील प्रमाणे अंतिम आदेश करतो.

**आदेश**

जामीन अर्ज क्रमांक २१४/२०२६ नामंजूर करण्यात येत आहे.

ANANT SIDDHESHWAR AWATE

Digitally signed by ANANT SIDDHESHWAR AWATE
Date: 2026.06.01 17:46:22 +0530

दिनांक – ०१.०६.२०२६. (अ. सि. आवटे)

जिल्हा न्यायाधीश–२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश

धाराशिव.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Laxman Sitaram Patil, Stenographer Grade - 1 |
| Court | - | District Court-2, Dharashiv (Osmanabad). |
| Date of order/Judgment | - | 01.06.2026 |
| Date of order/judgment signed by presiding officer. | - | 01.06.2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 01.06.2026 |